सकाळ २९-७-२०१५

# कचरा प्रकल्पांची न्यायाधीशांतर्फे चौकशी करा

## स्वयंसेवी संघटनांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**पुणे, ता. २८ :** घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या लेखापरीक्षणात १.७ कोटींची अनियमितता आढळली आहे. कचरा प्रकल्पांवर महापालिका कोट्यवधींचा खर्च करत असतानाही एकही प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालत नाही. या प्रकरणी निवृत्त न्यायाधीशांमार्फत चौकशी करण्याची मागणी स्वयंसेवी संघटनांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

नागरिक चेतना मंचाचे मेजर जनरल (निवृत्त) सुधीर जठार आणि सजग नागरिक मंचाचे विवेक वेलणकर व विश्वास सहस्त्रबुद्धे यांनी या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र दिले आहे. कचरा प्रक्रिया प्रकल्पांना घनकचरा विभागाने ४६ लाख ५० हजार रुपये जादा बिल दिल्याचे निदर्शनास आले आहे. कंत्राटदाराला जादा पैसे देणे, भुईभाडे न घेणे, दंड न करणे, अनामत रकमेची वसुली न करणे, प्रकल्प पूर्ण होण्यापूर्वी पैसे देणे, एकही



कचरा प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालत नाही. हंजर कंपनीकडून २ कोटी रुपयांची बँक गॅरंटी घेण्यात आली नाही. प्रकल्प उभारताना प्रदूषण नियंत्रण मंडळाची मान्यता घेतली नाही. त्यामुळे प्रदूषण होत आहे आदी बाबी या प्रतिनिधींनी निदर्शनास आणून दिल्या, तसेच अंतर्गत हिशेब तपासनिसाकडूनही अनेक त्रुटी राहिल्याचेही जठार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. ते म्हणाले, "रोकेम प्रकल्पातून वीज तयार झाली नसल्याचा उल्लेख अहवालात आहे. परंतु २०१४मध्ये या प्रकल्पातून २.९९ मेगावॉट वीजनिर्मिती झाल्याची माहिती वीज नियामक आयोगाला दिली आहे. रोकेम प्रकल्पामध्ये दररोज १५० टन मिश्रकचरा घेतला जातो आणि त्यासाठी महापालिका कंत्राटदाराला ३०० रुपये प्रतिटनाप्रमाणे दररोज ४५ हजार रुपये देते. परंतु कराराप्रमाणे या प्रकल्पामध्ये ७५० टन कचऱ्यावर प्रक्रिया करणे आवश्यक आहे. सध्या ५५० टन कचऱ्यावर प्रक्रिया होत नसल्याने करारानुसार कंपनीकडून दंड वसूल करणे आवश्यक आहे. या दंडाची रक्कम सुमारे दहा कोटी रुपये होत असतानाही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले."

हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालविला जात नाही. त्यामुळे निर्माण होणारा मिथेन गॅस जाळला किंवा सोडून दिला जातो. कोणत्याही प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला नाही. तसेच दुर्लक्ष केल्याने महापालिकेचे सुमारे शंभर कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे त्यांनी सांगितले.

## वृक्षप्राधिकरण बेकायदा

वृक्ष प्राधिकरणाची स्थापना ही बेकायदा झाली आहे. त्यामुळे प्राधिकरणाची शुक्रवारी (ता. ३१) होणारी बैठक रद्द करावी, तसेच वृक्ष अधिकाऱ्याचा प्रभार अतिरिक्त महापालिका आयुक्त ओमप्रकाश बकोरिया यांना देण्यात यावा, अशी मागणी वृक्षप्रेमींकडून केली जात आहे.

शहरातील वृक्षतोडीला परवानगी देण्याचा निर्णय वृक्ष प्राधिकरणाकडून घेतला जातो; परंतु उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या प्राधिकरणाची स्थापना झालेली नाही. त्यामुळे याबाबत उच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल झालेली आहे. त्यावर अंतिम निर्णय १२ ऑगस्ट रोजी निर्णय येणे अपेक्षित आहे. त्यापूर्वीच ३१ जुलै प्राधिकरणाची बैठक होणार आहे. यात ७०० वृक्ष तोडीबाबत निर्णय होणार आहे. त्यामुळे उच्च न्यायालयाचा निर्णय येईपर्यंत ही बैठक घेऊ नये, अशी मागणी वृक्षप्रेमी नंदकुमार गोसावी यांनी प्रभारी वृक्ष अधिकारी अशोक घोरपडे यांच्याकडे केली आहे.

ते म्हणाले, " नियमाप्रमाणे सहायक आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती होणे गरजेचे आहे. हा निकष पूर्ण होत नसल्यामुळे घोरपडे यांना बैठक घेता येणार नाही."

**वर्षभरात शहरातील १२०० वृक्षतोडीस मंजुरी दिली आहे; परंतु तोडलेल्या वृक्षांचे पुढे काय होते, याबाबत कोणतीही माहिती दिली जात नाही. त्यामुळे याबाबतची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी.**

**-नंदकुमार गोसावी, वृक्षप्रेमी**